दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 29 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 14 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मराठवाड्यात जोरदार पावसाची हजेरी

## लातूर जिल्ह्यात मुसळधार, अनेक गावांचा संपर्क तुटला


**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–** यंदाच्या गणेशोत्सवाचे आगमन पावसाच्या आगमनाने झाले आहे. गेल्या ४-५ दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने आज पुन्हा एकदा मुंबईसह मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात जोरदार हजेरी लावली आहे.लातूर जिल्ह्यात गेल्या सोळा तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे जिल्ह्यातील दहापेक्षा जास्त मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. अरुंद आणि कमी उंचीच्या पुलांवरून पाणी वाहत असल्याने खबरदारी म्हणून वाहतूक थांबवण्यात आली आहे. यापूर्वी नांदेड जिल्ह्यातही १० दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने मोठे नुकसान झाले होते. मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला, त्यामुळे दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. लातूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे १० पेक्षा जास्त मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे, तर बोरगावचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. लेंडी नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले आहे.उदगीर-मुक्रमाबाद रस्त्यावरील धडकनाळ येथील अरुंद आणि कठडे नसलेल्या पुलावरून पाणी वाहत असल्याने तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. मागील सोळा तासांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. शेतात पाणी साचले असून नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक गावांच्या सखल भागात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. लातूर जिल्ह्यातील इतरही दहा अरुंद पुलांवरून पाणी वाहत असल्याने ते पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.

आज भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील निलागोंदी गावात मुसळधार पावसामुळे एका घराची भिंत कोसळली. या दुर्घटनेत एका गाईसह चार शेळ्यांचा मृत्यू झाला, तर एक महिला आणि एक गाय गंभीर जखमी झाल्या. जखमी झालेल्या ३५ वर्षीय महिलेला, वैशाली वंजारी, यांना तातडीने साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बचावकार्य सुरू केले. ढिगारा हटवून मृत आणि जखमी जनावरांना बाहेर काढण्यात आले. जखमी जनावरांवर उपचारही करण्यात आले.



# मोर्चातील प्रा.गणेश धपाटे यांना मोटार सायकलची धडक

**केज । गौतम बचुटे**



केज तालुक्यातील प्रा. गणेश धपाटे हे मनोज जरांगे यांच्या आरक्षण मोर्चात मुंबईकडे जात असताना रस्त्यात ते लघु शंकेसाठी रस्ता ओलांडीत असताना एका मोटार सायकलीने त्यांना धडक दिली. त्यात ते जखमी झाले असून त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील वसंत महाविद्यालयात अध्यापनाचे काम करीत असलेले प्रा. गणेश धपाटे हे मनोज दादा जरांगे यांच्या मोर्चात मुंबईकडे जात होते. दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ते पुणे जिल्ह्यातील मंचर जवळ लघुशंकेसाठी थांबले असता रस्ता ओलांडताना त्यांना एका दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत ते जखमी झाले.या अपघातात प्रा. गणेश धपाटे यांचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. त्यांच्यावर पुणे जिल्ह्यातील मंचर येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

# राष्ट्रनिर्माता पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे शिक्षकांना आवाहन

## रोटरी क्लब करणार शिक्षकांचा सन्मान

**गेवराई । प्रतिनिधी**

कला, क्रीडा, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, सामाजिक आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोटरी इंटरनॅशनलच्या अखत्यारित असलेल्या गेवराई रोटरी क्लबच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रनिर्माता पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड ) शिक्षकांना दिला जाणार आहे . यासाठी इच्छुक सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत .हा क्लब स्थापन झाल्यापासून गेल्या तीन महिन्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असून विविध उपक्रमांमधून जनमानसात आपली प्रतिमा उमटविण्यात यशस्वी झाला आहे . यात पत्रकार बांधवांचा सिंहाचा वाटा आहे . ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षणतज्ज्ञ राधाकृष्णन यांचा जन्मदिन देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो . या दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने गेवराई तालुक्यातील शिक्षकांना राष्ट्र निर्माता पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे .यासाठी तालुक्यातील शिक्षकांनी आपले प्रस्ताव रोटरी क्लब गेवराई यांच्याकडे ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत . शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या समितीकडून प्रस्तावाची छाननी करून सदर पुरस्कार वृत्तपत्रातून जाहीर केले जातील . एका भव्य शानदार समारंभात शिक्षण तज्ज्ञांच्या उपस्थितीत हे पुरस्कार वितरित केले जातील . सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, महावस्त्र, शाल, श्रीफळ, बुके देऊन सन्मान केला जाईल . गेवराई तालुक्यातील शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक, आरोग्य, राष्ट्रीय कार्य ,कला, क्रीडा ,सांस्कृतिक, पर्यावरण आदी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा मिळून त्यांच्या हातून राष्ट्र उभारणीचे कार्य उत्तम रीतीने व्हावे हा या पुरस्कारा मागील उद्देश आहे . तालुक्यातील पात्र शिक्षकांनी आपले प्रस्ताव कार्याच्या पुराव्यासह रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे (९४२२७४ ४२६६ ) आणि सचिव प्रवीण जैन यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन रोटरी क्लब चे प्रोजेक्ट सर्विस चेअरमन धर्मराज करपे, समिती सदस्य गणेश कुलकर्णी, मनोज टाक, डॉ. किशन देशमुख, महेश मोटे ,डॉ. नागनाथ मोटे, जयराज कौराणी, उमेश बजाज आदींनी केले आहे.

# मराठा आंदोलनाच्या गाडीवर अहिल्या नगर जिल्ह्यात दगडफेक



**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील लव्हुरी येथील मराठा आंदोलनाच्या गाडीवर अहिल्या नगर जिल्ह्यात दोन अज्ञात इसमांनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे. यात गाडीचा काच फुटला आहे.

केज तालुक्यातील लव्हुरी येथील मराठा आंदोलक दत्तात्रय चाळक, गोकुळ चाळक, भैरु चाळक, सुदाम चाळक, श्रीकांत चाळक, संतोष चाळक आणि चालक सहदेव चाळक हे स्कॉर्पिओ क्र. (एम एच ४४ झेड ०४९४) ने मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा मोर्चात सहभागी होऊन मुंबईकडे जात असताना दिनांक २७ ऑगस्ट रोजी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास आळे फाटा जवळ मोटार सायकल वरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी दगडफेक केली. या गाडीचा साईड ग्लास आणि दरवाजाच्या खिडकीचा काच फुटला आहे. दगडफेक करून ते दोघे अज्ञात मोटार सायकल वरून पसार झाले. यात कोणीही जखमी नाही.


# मांजरा धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडले

## मांजरा नदीकाठच्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा प्रकल्प धनेगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसामुळे आणि धरणातील पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आज दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-१५ वाजता गेट क्रमांक १ ते ६ प्रत्येकी ०.५० मीटरने उघडण्यात आले आहेत

सध्या धरणातून एकूण १०,४८२.८४ क्युसेक्स (२९६.८८ क्युमेक्स) इतका विसर्ग सुरू आहे.धरणामध्ये होणारी पाण्याची आवक पाहून विसर्गात वाढ अथवा कपात करण्याचानिर्णय घेण्यात येईल,असे धरण प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



धरणातून सुरू असलेल्या विसर्गामुळे मांजरा नदीपात्रातील पाणीपातळी वाढणार असून नदीकाठावरील तसेच पुरग्रस्त होऊ शकणाऱ्या गावांतील नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी,असा इशारा मांजरा प्रकल्प धनेगाव पुर नियंत्रण कक्ष यांच्याकडून देण्यात आला आहे.

# मुंबई मराठा आरक्षण आंदोलनात पहिला बळी

## वरपगावचे सुपुत्र सतीश ज्ञानोबा देशमुख यांचे हृदयविकाराने निधन

**केज । प्रतिनिधी**

दि.२९ऑगस्टच्या मुंबई मराठा आरक्षणाचा पहिला बळी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील वरपगाव चे सुपुत्र सतीश ज्ञानोबा देशमुख यांच्या रूपाने गेला आहे.'मराठा समाजाला आरक्षण मिळावे' यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत दि.२९ ऑगस्ट मुंबईत होणाऱ्या आमरण ऊपोषणासाठी गेलेल्या लाखो मराठा समाज बांधवासोबत सतीश देशमुख सहभागी झाले होते. बुधवारी सकाळी ते गावातील कांहीं सहकाऱ्यांसोबत मुंबईच्या दिशेने निघालेल्या रॅलीत सहभागी झाले होते.बुधवारी रात्री जुन्नर येथे मुक्काम झाल्या नंतर गुरुवारी सकाळी १० वाजता ते आपल्या सहकाऱ्यासोबत आंघोळ,नाष्टा आटोपून रॅलीत नारायणगाव मार्गे मुंबईच्या दिशेने निघाले होते.गाडीत बसून दहा मिनिटे प्रवास करताच त्यांचा वाटेत हृदय विकाराच्या धक्याने त्यांचा मृत्यू झाला.

सतीश देशमुख अत्यंत शांत,जिद्दी व प्रामाणिक स्वभावाचे होते.सतीश देशमुख यांच्या परिवारा ला देशसेवेचा वारसा लाभलेला आहे.त्यांचे वडील ज्ञानोबा एकनाथराव देशमुख व लहान भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख हे भारतीय सैन्यदलात सेवारत होते.सध्याच्या मुंबई आंदोलनात भाऊ व्यंकटेश ज्ञानोबा देशमुख यांनी पुणे व बीड जिल्ह्यात गावोगावी फिरून मराठा बांधवांमध्ये आरक्षणाचे महत्व पटवून मोठीजनजागृती केली होती.यावेळी आपल्या मोठ्या भावाचे प्राण गमवावा लागतील याची कल्पनाही केली नसेल.या कुटुंबावर दोन वर्षात हा दुसरादुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन वर्षापूर्वीच सतीश देशमुख



यांच्या स्वप्नील नावाच्या मोठ्या मुलाचा विजेचा करंट लागून मृत्यू झाला होता. बेरोजगार असणारा स्वप्नील इतरांच्या ट्रॅक्टर वर काम करून कुटुंबाचा आधार बनू पाहत होता.ट्रॅक्टर वर काम करत असतानाच त्याचा मृत्यू झाला. सध्या सतीश देशमुख आपला दुसरा मुलगा शिवप्रसाद याला बारावी नंतरच्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याच्या विवंचनेत होते.कुटुंबाची परिस्थिती हलाखीची असल्याने व पॉलिटेक्निक च्या प्रवेशाचे मोठे शुल्क आवाक्याबाहेर असल्याने शिवप्रसाद च्या पॉलिटेक्निक प्रवेशासाठी ते चिंतीत होते.मराठा आरक्षणामुळे तरी आपल्या मुलाला शिक्षणात सूट मिळेल या आशेने ते या मुंबई मराठा आरक्षणात सहभागी झाले होते.

हे दुःखद वृत्त कळताच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मृत सतीश देशमुख यांचे लहान बंधू मराठा सेवक व्यंकटेश देशमुख यांना जवळ बोलावून त्यांचे सांत्वन केले व देशमुख कुटुंबाप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले.सतीश देशमुख यांच्या मागे आई,पत्नी संध्या,मुलगा शिवशंकर व लहान बंधू व्यंकटेश यांचा परिवार आहे.

# बीड नगरपरिषद प्रभाग रचना प्रकरणी आक्षेप दाखल-अनिल उर्फ (बंडू) निसर्गन

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद बीड येथे जुनीच प्रभाग रचना जाहीर केली आहे. व या प्रभाग रचनेविषयी पक्ष अर्ज दाखल करण्याची मुदत ३१ऑगस्ट २०२५ अशी आहे. अनेक प्रभागातील वस्त्यांची व नगरांची फोड करून अनेक मतदारावर अन्याय केला आहे. याचा आक्षेप प्रभाग चार मधील अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड. राहुल साळवे यांनी आक्षेप नोंदवला आहे. प्रभाग चार विषयी आक्षेप अर्ज दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी विधीज्ञ जुनी प्रभाग रचना बदलून नवीन प्रभाग रचना तयार करावी म्हणून आक्षेप मुख्याधिकारी नगरपरिषद तथा निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन जुनी प्रभाग रचना निर्माण करताना केली नाही. काही लोकांचा राजकीय फायदा व्हावा या दृष्टिकोनातून मुख्य वस्त्यांचे विभाजन करून दुसऱ्या प्रभागात नावे जोडण्यात आली आहे. त्यामुळे जुनी प्रभाग रद्द करून नवीन प्रभाग रचना अमलात आणावी यासाठी आक्षेप घेतला आहे. प्रमुख व मुख्य वस्ती आहे तसेच ठेवून प्रभाग रचना करण्यात यावी अशी मागणी अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड.राहुल साळवे यांनी लेखी निवेदनाद्वारे नगरपालिकेकडे केली आहे.



संपादकीय

## बुद्धीची देवता



संपूर्ण जनतेच्या ममत्त्वाचा, दैवत्वाचा, अस्मितेचा, श्रद्धाळू असा हा एकमेव गणेश. गणरायाचे आगमन म्हणजे सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असते. जोरदार सरींची बरसात झेलून सुखावलेले समस्त जीव आता उत्सव पर्वामध्ये चिंब भिजण्यासाठी सज्ज झाले आहेत. विघ्न दूर करून सुखाची चाहूल देणाऱ्या बाप्पाचे आज आगमन झाले. ऐलमा, पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... अवतीभवतीचा आनंद व उत्साहाच्या हिरव्यागार वातावरणात भाविकांनी गणेशाचे स्वागत केले.प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.गणेशोत्सवाची सुरुवात झाली ती भारतीयांना एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी. १८९३ साली स्थापन केलेला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा अनोखा प्रयत्न. जो पुढे जाऊन यशस्वी झाला. एका मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापासून सुरुवात होऊन घराघरांत, मंडपात गणराज विराजमान झाले आहेत. जीवनात अनोखे रंग भरणारा, स्नेह, प्रेम वाढवणारा हा उत्सव आहे. आजच्या घडीचे संघटन, शक्तीचे प्रतीक दर्शवितो. हे सर्व करत असताना या आनंदमय वातावरणात सर्व समाजाने एकत्र यावे त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली.चातुर्मासात श्रावणसरींनी आलेला पाऊस आपल्याबरोबर हिंदू सणांना घेऊन येतो. हिंदू धर्मातील ईश्वराची रूपे वेगळी असली तरी शेवटी सर्वांचा ईश्वर एकच आहे. हे निस्सीम सत्य विसरता कामा नये. चौदा विद्या, चौसष्ट कलेचा अधिपती असलेल्या श्रींचे आगमन सर्वांसाठी आनंदरुपी अमृत सोहळा आहे. बाप्पा आला रे आला... किती जिव्हाळ्याचा आतून येणारा आवाज. गोंडस, गोजिरवाणा, लोभस, लडिवाळ, सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन वाजत गाजत मोठ्या उत्साहात घरोघरी, गल्लोगल्ली, शहरात तसेच गावात झाले आहे. घरामध्ये गणपती बाप्पा जेव्हा विराजमान होतात तेव्हा घराचे मंदिर आपोआपच होऊन जाते. या पवित्र वातावरणात कधी दहा दिवस संपतात तेच समजत नाही. यामध्ये गौरी आगमन, गौरी पूजन व गौरी गणपती विसर्जन हे सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. आपल्याकडे सर्व असतातच यासाठीच की मरगळलेल्या मनाला पुन्हा चैतन्य ऊर्जा मिळावी ही ऊर्जा मिळताना मनामध्ये पवित्र भाव असावा. अनेक पिढ्यान पिढ्यांपासून बाप्पाची अतिशय मनोभावे पूजा केली जाते. लहान मुलांपासून ते वडीलधाऱ्यापर्यंत श्री गणेशाचे आगमन झाल्यावर प्रत्येकजण बाप्पाची सेवा करण्यात दंग होऊन जातो. कारण गणेश दैवत हे बुद्धीची देवता आहे. तसेच तो विघ्नहर्ता ही आहे. प्रथम पूजेचा शुभारंभाचा मान श्री गणेशाकडे जातो. अशा गणाचा अधिपती असलेल्या श्री गणेशाचे स्थान आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. बाप्पाचा आवडता प्रसाद मोदक. बाप्पाच्या नैवेद्याचा आधीच जिभेवर उड्या मारायला लागतो. या दिवसात एक वेगळेच वातावरण न्याहाळायला मिळत असते. बाप्पा विराजमान झाल्यावर विविध सुगंधी अगरबत्त्यांचा दरवळणारा सुवास, शेणाने सारवलेले अंगण, मातीच्या भिंतींना केलेली पानाफुलांची रंगरंगोटी, दाराला लावलेले तोरण, रांगोळीने सजलेले अंगण मन प्रसन्न करते. बाप्पाच्या आगमनामुळे रक्ताची नाती जवळ येतात, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण होते.वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्न कुरुमे देव, सर्वकार्येषु सर्वदा! गोलाकार सोंडेचा, विशाल शरीराचा, सूर्या समान तेजस्वी अशा विघ्नहर्ताची आमच्यावर कृपा असावी. आपल्या या वैदिक संस्कृतीमध्ये एक दयाळू देवता श्री गणेश विघ्नहर्ता बुद्धिवंत, सामर्थ्यवंत, शक्तीवन्त, रूपवंत देवता आहे. गणेश या संस्कृत शब्दाप्रमाणे अर्थ गण म्हणजे समूह तर ईश म्हणजे परमेश्वर.गणपती म्हणजे प्राणिमात्रांच्या समूहाचे रक्षण करणारा रक्षक. गणेश हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र आहे. याबद्दलची गोष्ट प्रत्येकाला माहीतच आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून वेद व्यासांनी डोळे मिटवून भागवत कथा सलग दहा दिवस गणपतीला ऐकवली. जी गणपतीने आपल्या दाताने लिहिली. दहा दिवसानंतर जेव्हा व्यासांनी डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की, गणेश एका जागी सतत बसून लिहिल्यामुळे अतिशय उष्णता शरीरात निर्माण झाली. त्यामुळे जवळील पाण्याच्या कुंडात वेद व्यासांनी त्यांना थंड केले. त्यामुळेच भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणरायाची स्थापना केली जाते आणि शितल करण्यासाठी अनंत चतुर्दशीला विसर्जन केले जाते.गणेश उत्सव हा बाल आणि तरुणांसाठी एक आनंदोत्सवच असतो. अशा वातावरणात कल्पनाशक्तीला वाव मिळतो. कौशल्याच्या सादरीकरणाची संधी मिळते. नवनवीन मित्र-मैत्रिणी गवसतात, एकत्र काम केल्यामुळे सुसंवादाला चालना मिळते. सगळे एका पातळीवर येऊन काम करत असल्यामुळे जवळीकता वाढते. एकप्रकारे या अनौपचारिक वातावरणात मैत्री फुलते. दोस्ती घट्ट होते. एकंदरीत संपूर्ण समाज या महोत्सवात विरघळून जातो, रममान होतो.श्री गणेश विद्येची देवता आहे. तसेच ती कलेची ही देवता आहे. त्यामुळे कलाकार मंडळी ही गणेश उत्सवामध्ये आपली कला सादर करण्यासाठी रंगून गेलेले असतात. गणपतीसमोर ठेवलेले लाडू, मोदक असे गोड पदार्थ लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतात. त्यामुळे गणेशोत्सवामध्ये बाळ गोपाळही रमून जातात. काहींच्या घरी दीड दिवसाचे गणपती तर काहींच्या घरी सात दिवसांचे गणपती असतात. पंचमी दिवशी दीड दिवसाचे गणपती जातात. त्यादिवशी ऋषीपंचमी साजरी केली जाते. याच दिवसात गौरीचे आगमन होते. गौरी पूजन आणि विसर्जनाचा सोहळा पार पडतो. काही गणपतीचे विसर्जन गौरी सोबतच होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वच गणपतीचे विसर्जन होते. गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या. गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला.

# मोलगी येथील वाग देव,गांवदेवती पूजा उत्सव नियोजन सभा संपन्न

**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी गावात बैल पोळ्यानंतर होणारा आदिवासी बांधवांचा रुढी परंपरागत वाघ देव आणि गावदेवती पूजा उत्सव हा ७ सप्टेंबरला होणार असल्याने मोलगी गावातील प्रमुख ग्रामस्थांची महत्त्व पूर्ण नियोजन बैठक मोलगी येथे संपन्न झाली.



मोलगी गावाचा वाघ देव व गावदेवती पुजा उत्सव हा मोलगी परिसरातील एक प्रसिद्ध उत्सव आहे. ही उत्सव पद्धत रुढी परंपराने चालत आली असुन या वर्षाचा उत्सव हा दि.०७ सप्टेंबर रोजी होणार असल्याने उत्सवाच्या नियोजनासाठी बैठक संपन्न झाली. या बैठकीत मोलगी गावांतील बारा पाड्यातील ग्रामस्थांची उपस्थिती होती. बैठकीत गावदेवी देव पूजेच्या यशस्वी आयोजनासाठी महत्वाचे निर्णय घेण्यात आले. आजची युवा पिढी व्यसनाधीन होत असुन ते रुढी परंपरागत पूजा पद्धत विसरत चालली आहे. म्हणून त्यांना या रुढीगत परंपरेचे ज्ञान मिळावे त्यांनी आपल्या संस्कृतीचे जतन करावे म्हणून दरवर्षा प्रमाणे आदिवासी बांधवांनी या वर्षीही मोठ्या संख्येने आपले पारंपारिक सांस्कृतिक ढोल आणावेत असे आवाहन करण्यात आले. त्याच प्रमाणे हा पूजा उत्सव सामूहिक नियोजनाने होत असल्याने त्या साठी लागणारे आर्थिक नियोजन लोकं वर्गणीतून करावे त्यासाठी प्रत्येक कुटुंबाने वर्गणी वेळेवर जमा करण्याचेही आवाहन करण्यात आले. गांवदेवती पूजा उत्सव हा गावातील लोकांच्या सुख शांती आणि समृद्ध जीवना साठी केला जातो. आदिवासी बांधव हा जल जंगल जमीन आणि त्यातील पशू पक्षी प्राणी यांनाही देव मानत असल्याने या दिवशी वाघाची प्रतिमात्मक पूजा केली जाते.नियोजन बैठकीच्या अध्यक्षस्थानी मोलगी गावाचे माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे हे होते तर मधुकर वसावे, आपसिंग वसावे, सागर वसावे, तानाजी वसावे, ऍड.सरदारसिंग वसावे, चंद्रसिंग वसावे, रामसिंग वसावे, कागड्या वसावे, वाड्या वसावे, भीमा वसावे, उग्राण्या वसावे, सुनील वसावे, आपसिंग वसावे, नवलसिंग वसावे, दामु वसावे,कालुसिंग वसावे,जामल वसावे, रविंद्र वसावे, रुपसिंग वसावे, बाजीराव पाडवी त्याच प्रमाणे हा पूजा उत्सव ज्यांच्या साक्षीने व पूजा विधीने होतो ते गावातील पुजारी नुरजी बाबा, विज्या वसावे, दमण्या वळवी, काल्या वसावे व बारा पाड्यातील ग्रामस्थं मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# श्री.चेतन सौंदळे यांना बीड जिल्हयातील भूमीपूत्र गौरव पुरस्काराने दै.लोकमतने केले सन्मानित

## राज्यपाल श्री.हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते सौंदळे यांना पुरस्कार

### सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल केले सन्मानित

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अग्रगण्य दै.लोकमतच्या वतीने बीड जिल्हयातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या प्रतिभासंपन्न,कर्तृत्वान व्यक्तिमत्वांचा भूमीपूत्र गौरव पुरस्कार राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहिम मा.श्री.हरीभाऊ बागडे(नाना) यांच्या हस्ते सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणारे ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी नगरीचे सुपुत्र नगरसेवक चेतन सौंदळे यांच्यासह बीड जिल्हयातील भूमिपुत्रांना शनिवार दि.२३ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,एडिटर इन चीफ लोकमत मीडिया श्री.राजेंद्रजी दर्डा व लोकमत छत्रपती संभाजी नगर आवृत्ती चे संपादक श्री.नंदकिशोर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजकारण असो की समाजकारण, लोकहितांसाठी धडपडणारे,सदोदित कार्य करणारे तरूण नेतृत्व म्हणून चेतन सौंदळे यांनी आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे.पक्ष कुठलाही असो राजकीय नेतृत्वाचा आपल्या परळी शहराच्या व बीड जिल्हयाच्या विकासासाठी कसा फायदा होईल हा विचार मनात ठेवून चेतन सौंदळे यांचे कार्य सुरू असते.



# हेकेखोरपणा ही एक मानसिकता

अनेकदा आपल्या आजूबाजूलासुद्धा आपण असे लोक बघतो जे कायम स्वतःच खरं करतात. अगदी कोणीही कितीही अनुभवी व्यक्तीने सल्ला दिला, मार्गदर्शन केले तरी काही व्यक्ती ते समजून उमजून घेण्याच्या मानसिकतेतच नसतात. अशा लोकांना स्वतःला स्वतःच्या चुकांचा, अविचारी निर्णयांचा खूप त्रास होतो पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीनुसार नुकसान होत असलं तरी ते अजिबात स्वतःमध्ये बदल करत नाहीत. एकदा आजूबाजूच्या सगळ्यांना असे भावनिक, मानसिक ब्लॅकमेल करून आपला कोणताही अट्टाहास पचू शकतो हे सिद्ध झाल्यावर ही व्यक्ती खूप आत्मविश्वासाने स्वतःच्या चुकांचे प्रमाण वाढवत नेते. अशा व्यक्तींच्या चुकांमुळे, चुकीच्या व्यवहारामुळे, वागण्यामुळे त्याचे स्वतःचे शारीरिक मानसिक स्वास्थ्य हरवतेच पण असे लोकं यासाठी मी जबाबदार आहे असं मान्य न करता वेळोवेळी कोणाचेही नाव पुढे करून त्याच्यावर आपल्या अपयशाच खापर फोडतात. हेकेखोरपणा अशा स्वभावामागील मानसिकतेचे सविस्तर कारण आणि त्यांच्या स्वभावामागे असलेल्या घटना या लेखामार्फत आपण जाणून घेणार आहोत.



मी म्हणतो तेच खरं अशा व्यक्तींच्या स्वभावात अनेक गुंतागुंतीची मानसशास्त्रीय कारणे दडलेली असू शकतात. बाह्यतः ही व्यक्ती हट्टी, दुर्लक्ष करणारी किंवा अहंकारी वाटू शकते. अशा व्यक्तीमध्ये काही ठरावीक मानसिक वैशिष्ट्ये दिसून येतात ते म्हणजे असुरक्षितता आणि भीती हा एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. अशा लोकांच्या मनात एक प्रकारची खोलवर रुजलेली असुरक्षितता असते. त्यामुळे, कोणत्याही कोणाच्याही सल्ल्याला किंवा मार्गदर्शनाला ते स्वतःवरचा हल्ला मानतात आणि त्याला विरोध करतात. त्यांच्या मते, दुसऱ्याचे मार्गदर्शन स्वीकारणे म्हणजे स्वतःची कमी कबूल करण्यासारखं आहे. दुसरे म्हणजेच नियंत्रण गमावण्याची भीती यांच्यामध्ये असते. दुसऱ्यांनी दिलेला सल्ला स्वीकारणे म्हणजे आपल्या आयुष्याचा ताबा दुसऱ्यांच्या हातात देण्यासारखं त्यांना वाटतं. ही नियंत्रण गमावण्याची भीती इतकी जास्त असते की, चुकीच्या मार्गावर असूनही ते स्वतःच्याच निर्णयावर ठाम राहतात. 'सत्य' आणि 'मी' यांची एकरूपता हा एक पैलू अशा लोकांमध्ये आढळतो. अशा व्यक्तीसाठी 'सत्य' हे त्यांच्या स्वतःच्या विचारांशी आणि कृतींशी जोडलेलं असतं. त्यांच्या मते, 'मी जे करतोय तेच बरोबर आहे' आणि 'मी जो आहे तोच बरोबर आहे'. त्यामुळे, त्यांच्या विचारांना किंवा कृतींना आव्हान देणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणे होय. जर कोणी त्यांच्या मताला, विचारांना, निर्णयाला आडवं गेलं, विरोध केला, त्यांना जे आवडत नाही, पटत नाही ते केलं तर हे लोक त्यांच्याशी संपर्क तोडतात. त्यांच्या मनाविरुद्ध वागणारी जितकी लोक असतील त्यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी हे पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या भूमिकेच्या आड येणारे आपले शत्रू आहेत, विरोधक आहेत अशी त्यांची मानसिकता असते आणि त्यामुळे आपल्या विरोधात अनेक लोकांचे एकमत होऊ नये आणि आपल्यावर सामूहिक हल्ला आपल्या वागणुकीविरोधात होऊ नये यासाठी ते पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या प्रत्येकाला ते आपला शत्रू मानत असल्यामुळे त्याची इतरांमध्ये बदनामी करणे, त्याच्या बद्दल अफवा पसरवणे, गटबाजी करणे, एखाद्याला एकटे पाडणे, त्याला टार्गेट करणे यातून हे लोकं स्वतःच्या चुकांना झाकण्याचा प्रयत्न करतात.चुका स्वीकारण्याची अक्षमता हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा या लोकांना कोणत्याही थराला नेण्यासाठी कारणीभूत असतो. आपल्या चुका मान्य करणे हे एक प्रकारचं मानसिक धैर्य आहे. पण, अशा व्यक्तीमध्ये हे धैर्य नसतं. त्यांना असं वाटतं की चूक स्वीकारणे म्हणजे पराभव स्वीकारणे. स्वतःला आणि इतरांना त्रास झाला तरी, ते या गोष्टी गांभीर्याने घेत नाहीत कारण त्यांना हे मान्य करायचं नसतं की त्यांची कृती, त्यांचा निर्णय चुकीचा होता. ते अनेक गंभीर गोष्टी उडवून लावतात, जेणेकरून त्यांना आपल्या चुकीचा सामना करावा लागणार नाही. आपल्या चुकीकडे कोणाचे लक्ष जाण्याअगोदर ते या चुकीचं खापर फोडण्यासाठी एखादा बळीचा बकरा शोधून ठेवतात. त्यांच्या नियंत्रणाबाहेर कोणतीही गोष्ट जाते आहे अस लक्षात आल्यास हे लोक ताबडतोब एखादी मन घडत कहाणी रचून इतरांच्या गळी उतरवतात आणि स्वतःची बाजू सुरक्षित करतात.अशा प्रकारच्या मानसिकतेची पाळे मुळे त्या व्यक्तीच्या बालपणात किंवा तिच्या मागील अनुभवांमध्ये दडलेली असू शकतात त्यावर नजर टाकणे गरजेचे आहे. बालपणीचे आघात यामागील जटील कारण आहे. काही व्यक्तींना बालपणी खूप टीका किंवा अपमान सहन करावा लागला असेल तर असे होऊ शकते. त्यांच्यावर वारंवार टीका झाल्यामुळे त्यांच्या मनात 'मी कधीच पुरेसा नाही' अशी भावना निर्माण होते. या भावनेपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी ते एक बचावात्मक कवच तयार करतात, ज्यामुळे ते कोणाचंही ऐकत नाही. आपलंच खरं करून स्वतःला कायम बरोबर आणि खरं सिद्ध करणे त्यांच्यासाठी रोजची लढाई असते. कमी 'आत्मसन्मान' असणे. कमी आत्मसन्मान असणाऱ्या व्यक्तींना असं वाटतं की ते चुकीचे आहेत किंवा कमी आहेत. या असुरक्षिततेतून बाहेर पडण्यासाठी ते स्वतःलाच श्रेष्ठ मानू लागतात. दुसऱ्यांचा सल्ला नाकारून ते तात्पुरती श्रेष्ठत्वाची भावना अनुभवतात. ही एक प्रकारची मानसिक भरपाई असते. कोणाचं काही ऐकून घेणे त्यांना कमीपणा वाटतो. 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्वविकार'देखील अशी व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी कारणीभूत असतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये, हे वर्तन 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्व विकारा'शी संबंधित असू शकतं. या विकारात, व्यक्तीला स्वतःबद्दल खूप जास्त महत्त्व वाटतं. त्यांना असं वाटतं की ते अद्वितीय आहेत आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्या आजूबाजूचे सगळे मूर्ख आहेत त्यांना काहीही सांगून दिशाभूल करणे सोपे आहे. या वृत्तीमुळे त्यांना कोणाच्याही सल्ल्याची गरज वाटत नाही. दुसऱ्यांच्या भावना किंवा त्रासाची त्यांना पर्वा नसते, कारण त्यांच्यासाठी फक्त स्वतःचे विचार, हट्ट आणि गरजा महत्त्वाच्या असतात. आपल्या नियमानुसार जग चालले पाहिजे ही त्यांची हटवादी वृत्ती असते. जो आपलं अंधानुकरण करत नाही, जे लोक एकमेकांना विश्वासात घेवून आपल्या कोणत्याही गोष्टीला विरोध करतात त्यांना वाटते त्या लोकांना फोडण्यासाठी, तोडण्यासाठी, वेगळे करण्यासाठी असे लोक वेगवेगळ्या पद्धतीने, प्रकाराने प्रयत्न करतात.'संरक्षण यंत्रणा' अशा व्यक्ती वारंवार काही विशिष्ट संरक्षण यंत्रणांचा वापर करतात. जसे की 'नकार'. ते समस्या अस्तित्वातच नाहीये असं मानतात, जेणेकरून त्यांना त्या समस्येचा सामना करावा लागणार नाही. तुम्ही ज्या गोष्टीला समस्या किंवा त्रास म्हणत आहात तो माझ्या लेखी त्रास नाहीच आहे कोणतीही समस्या नाहीच आहे असं ते इतरांना पटवून देतात. कोणतीही चुकीची घटना घडल्यावर पण हे असे झालेच नव्हतेच हे माझ्यामुळे नाही झाले याला कारणीभूत भलतीच व्यक्ती होती. या पद्धतीने पटवून देण्यात हे लोक माहीर असतात. जे कोणी अशा लोकांना काही गंभीर चुकांचे, घटनांचे भविष्यात होणारे गंभीर परिणाम लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतो त्याला हे लोक वेसण घालण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांकडून अनेकदा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना खूप मर्यादा घातल्या जातात, बंधनात ठेवले जाते, इतरांवर लक्ष आणि नजर ठेवली जाते. इतरांचे वागणे, बोलणे कंट्रोल करून इतरांमध्ये फूट पाडून ही व्यक्ती स्वतःला सुरक्षित समजते. प्रत्येकजण माझ्याच बाबतीत माझ्या मागे काहीतरी बोलेल, माझ्याबद्दलच चर्चा होईल, माझ्या विरुद्ध काही नियोजन अथवा कट केला जाईल ही भीती अशा लोकांना कायम वाटतं असते. मी जे करत नाही, मला जे आवडत नाही ते तुम्हीही करू नका, मला जे पटत नाही ते कोणीच करायचं नाही अशी त्यांची अपेक्षा असते. मला जे अपेक्षित नाही त्याबद्दल कोणी आपापसात बोलायच पण नाही यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. अशा व्यक्तीचा स्वभाव केवळ 'हट्टीपणा' नसून त्यामागे खोलवर रुजलेली असुरक्षितता, भीती आणि मानसिक आघातांशी संबंधित जटिल भावना असू शकतात. हे वर्तन त्यांचे आंतरिक जग सुरक्षित ठेवण्याचा एक मार्ग असतो, भलेही त्यामुळे त्यांना आणि इतरांना त्रास होत असला तरी.अशा व्यक्तीला मदत करण्यासाठी, तिच्या वर्तनाला केवळ 'चुकीचे' ठरवण्याऐवजी, त्यामागची खरी कारणे समजून घेणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्ती, अशा मानसिकतेमधून जाणारी कुटुंब यांच्यासाठी समुपदेशन, एकमेकांशी मोकळा संवाद साधने, सतत बोलत राहणे, परस्परांना समजावून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या बाबतीत असे कोणी करत असेल अथवा घडतं असेल तर वेळीच जागे होणे, कोणाच्याही खोट्या रचलेल्या मिथ्या ना बळी न पडणे, अशा लोकांच्या सांगण्यावरून आपल्या संपर्कातील चांगली जवळची माणस न गमावणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# लंडनमध्ये साकारणार ‘महाराष्ट्र भवन’:मराठीजनांना मिळणार हक्काचे सामाजिक केंद्र, शासनाकडून ५ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लंडनमधील मराठी लोकांना आता स्वतःचे सांस्कृतिक केंद्र मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला 'चर्च ऑफ इंग्लंड'ची एक जुनी इमारत खरेदी करण्यासाठी आणि तिथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याबाबतची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून लंडनमध्ये स्वतःचे सांस्कृतिक केंद्र असावे, अशी मराठी लोकांची मागणी आता पूर्ण होणार आहे. या मदतीबद्दल महाराष्ट्र मंडळाने शासनाचे आभार मानले आहेत.लंडनमधील मराठीजनांना आपल्या हक्काचे आणि स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक भवन मिळावे, या अनेक वर्षांच्या मागणीला आता मूर्त स्वरूप मिळणार आहे. महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला लंडनमधील ‘चर्च ऑफ इंग्लंड’ची इमारत खरेदी करुन तिथे ‘महाराष्ट्र भवन’ उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र मंडळ, लंडन ही परदेशातील सर्वात जुनी मराठी संस्था मानली जाते. १९३२ साली महात्मा गांधींचे सचिव डॉ. एन. सी. केळकर यांनी तिची स्थापना केली. स्थापनेपासूनच मराठी बांधवांना सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी एकत्र आणण्याचे कार्य हे मंडळ करत आहे. गेली ९३ वर्षे ते विविध सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांद्वारे मराठी अस्मिता जपण्यात अग्रेसर राहिले आहे.आज लंडन आणि परिसरात जवळपास एक लाखाहून अधिक मराठी कुटुंबे वास्तव्य करत आहेत. मात्र मंडळाचे सर्व कार्यक्रम आतापर्यंत भाड्याच्या जागांवरच पार पडत होते. त्यामुळे स्वतःचे कायमस्वरूपी सांस्कृतिक भवन असावे, अशी मागणी समाजातून सातत्याने केली जात होती. गेल्या आठवड्यात मंडळाच्या प्रतिनिधींनी पुण्यात अजित पवार यांची भेट घेऊन शासनाकडून आर्थिक मदतीची विनंती केली होती. त्यावर तातडीने सकारात्मक प्रतिसाद देत दिला प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने राज्य शासनाने या संस्थेला ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. हा निधी ‘महाराष्ट्र भवन’ उभारण्यासाठी वापरला जाणार असून, यामुळे मराठीजनांना लंडनमध्ये स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक आणि सामाजिक केंद्र मिळणार आहे.महाराष्ट्र भवन हे युनायटेड किंगडम आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल. या भवनामुळे मराठी साहित्य, नृत्य, संगीत आणि सण-उत्सवांच्या माध्यमातून भारत व युनायटेड किंगडम यांच्यात सांस्कृतिक आदान-प्रदानाला चालना मिळेल. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी भाषा वर्ग, कार्यशाळा तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करता येईल. यामुळे मराठी भाषा जागतिक स्तरावर अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र मंडळ लंडन



## ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले कर्मचाऱ्यांच्या गणेशाचे पूजन

**ठाणे** । प्रतिनिधी

श्रीगणेशाची कृपादृष्टी सगळ्यांवर राहो, श्रीगणेशाच्या कृपेने ठाणे महापालिकेची कीर्ती कायम वृद्धिंगत होवो, अशी प्रार्थना ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली. ठाणे महापालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीचे पूजन आयुक्त राव आणि त्यांच्या पत्नी प्रियांका राव यांनी केले. राव यांचे सुपुत्र आंजनेय, भाचे अविनाश आणि अनुराग शाही हेही पूजेला उपस्थित होते.



ठाणे महापालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे ४३वे वर्ष आहे. मंडळाचे अध्यक्ष असलेल्या महापालिका आयुक्त यांनी गणेशोत्सवाच्या सर्व ठाणेकरांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे (२), उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त मीनल पालांडे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, मंडळाचे सचिव पी. एच. पाटील, कार्यवाह आर. के. पाटील आदी उपस्थित होते.

## चंद्रपूरचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. रमेशकुमार बोरकुटे यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा मान

**नवी दिल्ली** । प्रतिनिधी

चंद्रपूरचे ख्यातनाम सामाजिक कार्यकर्ते डॉ. रमेशकुमार बोरकुटे साहेब यांना त्यांच्या समाजहिताच्या कार्याबद्दल नॅशनल एक्सीलेंस अवार्ड, इंटरनॅशनल प्रेस्टीज अवार्ड आणि भारत सम्मान अवार्ड २०२५ अशा तीन मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. नॅशनल एक्सीलेंस अवार्ड - आंबेडकर ग्लोबल फाऊंडेशन दिल्ली तर्फे, केंद्रीय मंत्री मा. श्री. रामदास आठवले यांच्या हस्ते. =९ इंटरनॅशनल प्रेस्टीज अवार्ड - कितेश कॉर्पोरेट प्रॉडक्शन दिल्ली तर्फे, पद्मश्री बॅडमिंटन खेळाडू मिस. सायना नेहवाल यांच्या हस्ते. भारत सम्मान अवार्ड २०२५ - ग्लोबल एक्सीलेंस फोरम दिल्ली तर्फे, अरुणाचल प्रदेश सरकारचे मंत्री मा. श्री. तागे टाकी यांच्या हस्ते. या सोहळ्याला



प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. कपिल मिश्रा (कैबिनेट मंत्री, दिल्ली सरकार), मा. श्री. न्यातो दुकम (कैबिनेट मंत्री, अरुणाचल प्रदेश सरकार), मा. डॉ. रवींद्र नारायण बेहरा (सांसद), मा. डॉ. अलो लिबांग (अरुणाचल प्रदेश मुख्यमंत्री सल्लागार), मा. जितेंद्र मणि, आयपीएस (डीसीपी, दिल्ली पोलीस), मा. सुश्री इरा सिंघल, आयएएस (सचिव, आरोग्य विभाग, अरुणाचल प्रदेश), मा. डॉ. संदीप मारवाह (भारतीय चित्रपट दिग्दर्शक व जागतिक अध्यक्ष, ग्लोबल एक्सीलेंस फोरम), मा. श्री. गोपालकृष्ण अग्रवाल (राष्ट्रीय प्रवक्ता, भाजप), तसेच मा. डॉ. जगन्नाथ पटनायक (कुलगुरू - आयसीएफएजे व कलिंग विद्यापीठ) तसेच या सोहळ्यास विविध राज्यांतील मंत्री,खासदार,आयपीएस,आय एस अधिकारी तसेच शिक्षण व उद्योगक्षेत्रातील मान्यवरांची उपस्थित होती... या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन मा. श्री. जितेंद्र रवी, अध्यक्ष - ग्लोबल एक्सीलेंस फोरम यांनी केले. हा सन्मान चंद्रपूर जिल्ह्यासाठी व महाराष्ट्रासाठी मोठा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

## लाडकी बहीण योजनेत गैरव्यवहार;२६ लाख लाभार्थी अपात्र

# छाननीनंतर योग्य कारवाई करण्यात येणार-अदिती तटकरे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या काळात महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना काढली आणि याचा चांगलाच फायदा निवडणुकीत झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु, आता या योजनेचा लाभ काही अपात्र लोकांनी देखील घेतला असल्याचे समोर आले आहे. तब्बल २६ लाख लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र नसल्याचे समोर आले आहे. याबाबत महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.अदिती तटकरे यांनी ट्विट करत माहिती दिली की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थींपैकी सुमारे २६ लक्ष लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र दिसून येत नसल्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राथमिक माहिती उपलब्ध करुन दिली होती. सदर सुमारे २६ लक्ष लाभार्थी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आहेत.त्यानुसार महिला व बालविकास विभागाने सदर लाभार्थींची प्राथमिक




माहिती संबंधित जिल्हा यंत्रणेला छाननीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार हे लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र ठरतात किंवा नाही याबाबतची सुक्ष्म छाननी क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. छाननीअंती या लाभार्थींची पात्रता/अपात्रता स्पष्ट होणार आहे.छाननीअंती जे लाभार्थी अपात्र ठरतील त्यांच्याबाबत माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य कारवाई करण्यात येईल, तसेच पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ यापुढेही पुवर्वत सुरु राहील, अशी माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे.दरम्यान, यावर राज्याचे अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अपात्र आढळलेल्या महिला लाभार्थींना फक्त योजनेतून बाहेर काढले जाईल. त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा निधी परत घेण्याचा सरकारचा विचार नसल्याचे म्हटले आहे.राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत मोठा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. सरकारने राबवलेल्या शोधमोहिमेमध्ये तब्बल २६ लाख ३४ हजार बोगस लाभार्थी आढळले आहेत. हे सर्व लाभार्थी प्रत्यक्षात पात्र नसतानाही दरमहा १५०० रुपयांचा निधी घेत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सरकारची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## मराठा आरक्षणाच्या वादात शिंदे गट सावध:मनोज जरांगेंवर प्रतिक्रिया देऊ नका एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांना सूचना

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा तापला असून, मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. हायकोर्टाने त्यांना मुंबई येण्यापासून मनाई केली असली, तरी ते आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शिंदे गटाने मात्र सावध भूमिका घेत मौन बाळगल्याचे दिसून येत आहे. त्यातच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबद्दल माध्यमांसमोर कोणतेही विधान न करू नका, अशी सक्त ताकीद उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना दिल्याची माहिती समोर येत आहे. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली असून, त्यांचा रोख मुख्यत्वे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. एकनाथ शिंदे हे मराठ्यांना आरक्षण द्यायला तयार होते, पण फडणवीस यांनीच यात अडथळे आणले, असा आरोप जरांगे यांनी केला आहे. फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा दावाही त्यांनी केला आहे.मनोज जरांगे सातत्याने फडणवीसांवर टीका करत असताना, एकनाथ शिंदे मात्र मौन राखताना दिसत आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर शिवसेनेच्या मंत्र्यांच्या घेतलेल्या गुप्त बैठकीत त्यांनी आपल्या मंत्र्यांनाही माध्यमांसमोर प्रतिक्रिया देऊ नका, अशा सूचना दिल्या आहेत. यासोबतच बोलताना महायुती बाबत समन्वय साधून बोलणे अपेक्षित आहे, अशी चर्चा झाल्याचे समजते. तसेच गणेशोत्सव काळामध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचा, गाव तिथे शाखा, घर तिथे



शिवसैनिक या व्याख्येनुसार पक्षवाढीसाठी प्रयत्न करा, असे निर्देश एकनाथ शिंदेंनी त्यांच्या मंत्र्यांना दिलेत.दरम्यान, मनोज जरांगे हे देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट टीका करत असताना, भाजप नेत्यांनी त्यांच्यावर टीकेचा भडीमार सुरू केला असून, प्रत्युत्तर दिले जात आहे. त्याचवेळी दुसरीकडे, शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई मात्र जरांगे यांच्या बचावासाठी पुढे आले आहेत. त्यांनी म्हटले की, मराठवाड्याची बोलण्याची शैली तशीच आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी वापरलेला चुकीचा शब्द मागे घेतला. तसेच आपण मराठा समन्वय समितीचा सदस्य आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये मध्यस्ती करण्याची जबाबदारी जर आपल्याला दिली तर ती पार पाडू असा विश्वासही शंभुराज देसाई यांनी व्यक्त केला.

## जीवनदीप प्रकाशन मीडिया मॅनेजर डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ‘सुवर्णपथ’ ग्रंथाचे प्रकाशन

**मुंबई** । प्रतिनिधी

जीवनदीप प्रकाशन मीडिया चे मॅनेजर डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करणारा ‘सुवर्णपथ - जीवनदीप ते ज्ञानदीप’ हा ग्रंथ आज एका भव्य सोहळ्यात प्रकाशित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे इंडियन ऑइलचे माजी अधिकारी सुरेश केदारे, जीवनदी प्रकाशनचे प्रमुख जीत फुरिया, माजी पोलिस अधिकारी जाधव, इंटरनॅशनल स्पीकर डॉ. पवन अग्रवाल, शिवव्याख्याते प्रा. रवींद्र पाटील, हास्य अभिनेते जॉनी रावत व विजय कदम, केतकी प्रकाशनचे चंद्रकांत जाधव हे होते. कार्यक्रमाचे आयोजन मंदार पनवेलकर, अनंता धरणेकर, कुमारी मानसी पोळ यांनी केले होते.

प्रमुख पाहुणे सुरेश केदारे यांनी भाषणात डॉ. पोळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करताना, डॉ. गोरखनाथ पोळ यांनी माणसं जोडली आणि ती नातं जपत ठेवली हीच त्यांची खरी



संपत्ती आहे, असे सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जीवनदी प्रकाशनचे प्रमुख जीत फुरिया म्हणाले, मागील २५ वर्षांपासून डॉ. पोळ हे जीवनदी प्रकाशनचा कणा आहेत. आम्ही जरी मालक असलो तरी आमच्या यशामागचे खरे श्रेय त्यांचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

इंटरनॅशनल स्पीकर डॉ. पवन अग्रवाल यांनी मित्र कसा असावा यावर भाष्य करत मुंबई डबेवाल्यांचे उदाहरण दिले आणि त्यांच्या प्रतीकात्मक सायकल व डब्याची भेट देऊन डॉ. पोळ यांचा सन्मान केला. लेखिका स्मिता पनवेलकर यांनी मागील २७ वर्षांचा इतिहास सांगताना डॉ. पोळ आमच्यासाठी फक्त सहकारी नसून भाऊसमान आहेत, असे भावनिक शब्द उच्चारले.

कार्यक्रमाला पोळ सरांचे मित्रपरिवार, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडलेला हा सोहळा डॉ. पोळ यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय क्षण ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण लांडगे पाटील यांनी केले तर सुयश सामाजिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमेश संकपाळ यांनी आभार मानले

## मनमाड-इंदूर रेल्वे भूसंपादनासाठी विशेष समिती फेरसर्वेक्षणाचे महसूलमंत्री बावनकुळे यांचे निर्देश

### प्रकल्पात शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य

**मुंबई** । प्रतिनिधी

मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी होणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही, याची हमी देत एक विशेष समिती स्थापन करून पुनःसर्वेक्षणाचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीला योग्य आणि वाढीव मोबदला मिळावा, यासाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीला पणन आणि राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल, धुळे जिल्हाधिकारी, आणि भूसंपादन अधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

यावेळी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. भूसंपादनासाठी त्यांना योग्य मोबदला मिळत



नाही. त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले. प्रति चौरस मीटर दराने मोबदला, महापालिका हद्दीतील जमिनींना वाढीव दर, पिकांचे आणि विहिरींचे योग्य मूल्यांकन, तसेच रेल्वे मार्गामुळे शेतांचे झालेले तुकडे आणि पुराच्या पाण्याचा धोका यांसारख्या समस्यांचा निवेदनात समावेश आहे.मंत्री बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांचे नुकसान कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः बाधित शेतकऱ्यांबरोबर बैठक घेऊन त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करताना प्रशासनाने पूर्ण दक्षता बाळगावी. भूसंपादन प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहता कामा नये आणि शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. त्यांनी भूसंपादनात चुकीच्या पद्धतीचा अमल करण्यावर कठोर कारवाईचा इशारा देत, शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच, रेल्वे मार्गामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे दोन भाग झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याचे आणि पूरहानी टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले

# सतीश देशमुख यांच्या मुलाला सरकारी नोकरी द्या अन्यथा मृतदेहावर अंतीम संस्कार न करण्याचा ग्रामस्थांचा निर्णय

## तहसीलदारांना दिले गावकऱ्यांनी निवेदन

**केज । गौतम बचुटे**

मराठा समाजाच्या आरक्षण मागणीसाठी अंतरावली सराटी ते मुंबई निघालेल्या मोर्चात सहभागी झालेले बीड जिल्ह्यातील वरपगाव ता. केज येथील मराठा सेवक स्व. सतिश ज्ञानोबा देशमुख यांचा हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने पुणे जिल्ह्यात मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असून त्यांच्यावर कर्ज आहे आणि ते अल्पभूधारक शेतकरी असल्याने त्यांच्या मुलाचा समावेश सरकारी नोकरीत करण्यात यावा; तो पर्यंत स्व. सतिश देशमुख यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करणार नसल्याची भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

बीड जिल्ह्यातील वरपगाव ता. केज येथील सतीश ज्ञानोबा देशमुख या ४५ वर्षीय तरुणाचा मनोज दादा जरांगे यांच्या आंतरवली सराटी ते मुंबई या मराठा आरक्षण मागणीसाठी निघालेल्या मोर्चात सहभागी असताना त्यांना जुन्नर येथे हृदय विकाराचा झटका आला. त्या नंतर त्यांना पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील रुग्णालयात मृत्य झाला. मृत्यू झाल्याचे समजताच मनोज दादा जरांगे यांनी नारायणगाव येथील रूग्णालयात जाऊन त्यांच्या भावाचे सांत्वन केले.

दरम्यान सतीश देशमुख यांचे पार्थिव वरपगाव येथे आणण्यात येत असून दि. २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी ९:०० वाजता अंत्यविधी होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र दि. २८ ऑगस्ट रोजी रात्री ९:०० वाजण्याच्या सुमारास वरपगाव येथील नागरिकांनी तहसीलदारांना निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, सतीश देशमुख यांच्या कुटुंबाची



आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आहे. ते अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्यावर सेवा सहकारी सोसायटीचे कर्ज आहे. त्यामुळे सतीश देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय देण्यात यावा. त्यांच्या मुलाला सरकारी नोकरी देण्यात यावी. जो पर्यंत या कुटुंबाला न्याय मिळत नाही आणि त्यांच्या मुलाला सरकारी नोकरीत समावेश होत नाही. तो पर्यंत स्वर्गीय सतिश देशमुख यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार न करण्याचा निर्णय

> माझे चुलते सतीश देशमुख यांचा एक मुलगा पूर्वी विजेचा शॉक लागून मृत्यू पावला आहे. तर त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आणि वाईट असल्याने त्यांच्या मुलाला न्याय देऊन त्याला सरकारी नोकरी द्या.
>
> –जयदीप देशमुख (पुतणे)

वरपगाव येथील ग्रामस्थानी घेतला आहे.

या संदर्भात त्यांनी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून नायब तहसीलदार आशा वाघ–गायकवाड यांनी निवेदन स्वीकारले आहे.

**सरकार काय भूमिका घेणार ! :–** सतीश देशमुख यांचे पार्थिव वरप गाव येथे आणण्यात येत आहे. मात्र गावकऱ्यांनी घेतलेल्या निर्णयात बाबत आता सरकार काय भूमिका घेते ? आणि या बाबत प्रशासन काय करणार ?

## जिल्हाधिकारी कार्यालयात बारगळ जमीनप्रश्नी बैठक

# संबंधित विभागांनी दोन आठवड्यात अहवाल सादर करावा–डॉ.मिताली सेठी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

बारगळ इनाम जमीन तळोदा नगर परिषदेकडे भूसंपादित करण्यात आली होती.१० एकर क्षेत्राची सध्या मिळकती कोणाच्या नावाने आहेत याची उपअधीक्षक भूमिअभिलेख, नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी तपासणी करून दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांनी दिले.



तळोदा नगरपालिका हद्दीतील बारगळ जमिनीबाबत शिवसेनेचे संपर्कप्रमुख,आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी उपस्थित केली होती. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी बैठक घेण्यात आली. यावेळी डी.पी. प्लॅननुसार सर्वे नंबरची माहिती देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी मिताली सेठी म्हणाल्या, नगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार सदर जमिनीतील कोणते सर्वे नंबर आहेत याची खातरजमा करून अहवाल सादर करावा. घरकुल लाभार्थ्यांच्या दृष्टीने उपाययोजना जमिनीचा उपयोग घरकुल लाभार्थ्यांसाठी कसा करता येईल याबाबत आवश्यक उपाययोजना प्रस्तावित करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.यावेळी आ.चंद्रकांत रघुवंशी, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, उपजिल्हाधिकारी (प्रशासन)प्रमोद भामरे,निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती कल्पना ठुबे, उपअधीक्षक भूमिअभिलेख चांगुने,तळोदा नगरपालिकेचे मुख्याधिकारी जगदाळे, तळोदा तहसीलदार दीपक देवरे,संदीप परदेशी,अनुप उदासी, हितेंद्र क्षत्रिय,जितेंद्र दुबे,रोहित माळी उपस्थित होते.

# तळोद्यात मराठी पत्रकार संघाकडून बाप्पांची विसर्जन मिरवणूक; गुलालाऐवजी फुलांची उधळण

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही तळोदा तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दीड दिवसाच्या गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती, ज्याचे विसर्जन गुरुवारी शहरातून शांततेत पार पडले. विशेष म्हणजे, या मिरवणुकीत गुलालाचा वापर न करता केवळ फुलांची उधळण करण्यात आली, ज्यामुळे ही मिरवणूक शहरातील नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.



बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ रोजी तळोदा तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने गणपती बाप्पांची स्थापना करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी, गुरुवार, २८ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक ८ वाजून ३० मिनिटांनी वाजता स्मारक चौकातून बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली. एका सुंदर अशा फुलांनी सजवलेल्या पालखीत बाप्पा विराजमान झाले होते.ही मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून जात आनंद चौक मार्गे श्रीराम मंदिर येथे पोहोचल्यानंतर मिरवणुकीची सांगता झाली आणि बाप्पांना विसर्जनासाठी हातोडा येथील तापी नदी पात्रात नेण्यात आले.

या मिरवणुकीत मराठी पत्रकार संघाचे सर्व सदस्य, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकसारख्या गांधी टोप्या परिधान केल्या होत्या, ज्यामुळे मिरवणुकीला एक शिस्तबद्ध स्वरूप आले होते. मिरवणुकीदरम्यान कोणताही गोंधळ किंवा गुलालाची उधळण न करता, शांतपणे आणि उत्साहाने फुलांची उधळण करत बाप्पांचा निरोप घेण्यात आला. या आगळ्यावेगळ्या मिरवणुकीचे शहरवासीयांनी कौतुक केले. या उपक्रमामुळे सामाजिक सलोखा आणि पर्यावरणाची काळजी घेण्याचा संदेश देण्यात आला, ज्यामुळे ही मिरवणूक केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाची ठरली.

# नंदुरबारमध्ये 'आदी कर्मयोगी' अभियान सुरू आदिवासी गावांमध्ये योजना पोहोचवण्यावर भर

**नंदुरबार । दिपक गोसावी**

केंद्र सरकारच्या जनजातीय कार्य मंत्रालयाने सुरू केलेल्या 'आदी कर्मयोगी' अभियानाचे उद्घाटन नुकतेच नंदुरबार येथे झाले. जिल्हाधिकारी मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात आदिवासी गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.



या अभियानाचा मुख्य उद्देश 'सेवा, समर्पण आणि संकल्प' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत सरकारी योजनांचा लाभ पोहोचवणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करणे हा आहे. या अभियानाअंतर्गत १ लाख आदिवासी गावांमध्ये २० लाख आदी कर्मयोगी, आदी सहयोगी आणि आदी साथी असे नेतृत्व तयार केले जाईल. हे प्रशिक्षित कार्यकर्ते विविध योजनांची माहिती आणि लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे काम करतील.

कार्यक्रमात जिल्हा मास्टर ट्रेनर्सची ओळख करून देण्यात आली. त्यांनी नाशिक येथे झालेल्या प्रशिक्षणाबद्दल माहिती दिली. जिल्हाधिकारी सेठी यांनी या अभियानाला एका मिशनच्या स्वरूपात राबवण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्व विभागांना तालुका मास्टर ट्रेनरची नियुक्ती करण्याचे आणि ग्राम कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा यांच्यासह इतर अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उमेश भदाणे कृषी अधिकारी यांच्या समन्वयाने उपस्थित मान्यवरांनी दिवा लावून अभियानाचे औपचारिक उद्घाटन केले.

# जिल्हा पोलीस दलात अत्याधुनिक फॉरेन्सिक वाहनाचा समावेश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या पोलीस दलात आता एक नवीन, अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील गंभीर गुन्ह्यांचा तपास अधिक जलद आणि अचूकपणे होण्यास मदत होणार आहे. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या हस्ते या व्हॅनचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले.




राज्यातील गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी शासनाकडून जिल्हा पोलीस दलाला ही व्हॅन पुरवण्यात आली आहे. या अत्याधुनिक व्हॅनमुळे घटनास्थळावरील भौतिक, रासायनिक, जैविक आणि डिजिटल पुरावे गोळा करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे गुन्हेगारांवर कारवाईसाठी आवश्यक असलेले भक्कम पुरावे मिळवता येतील. यामुळे तपास पथकाची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास पोलीस अधीक्षक श्रवण दत्त यांनी व्यक्त केला. लवकरच आणखी दोन फॉरेन्सिक वाहने पोलीस दलात सामील होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक महेंद्र चव्हाण, वाचक सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाणे आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ५ सप्टेंबर शिक्षक दिनी राजयोगच्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनी शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी आश्रम शाळेसह दुर्गम भागातील आणि माध्यम क्षेत्राशी निगडित आदर्श शिक्षकांना राज्यस्तरीय पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे पहिल्या टप्प्यातील सहा शिक्षकांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. निवड केलेल्या शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने प्रतिवर्षी वर्धापन दिन हा विविध क्षेत्रातील आदर्श गुणवंत शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन साजरा करण्यात येतो. यावर्षी आश्रम शाळेतील शिक्षकांसह जिल्हा परिषद, खाजगी शैक्षणिक संस्था, माध्यम क्षेत्राशी निगडित शिक्षकांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये आश्रम शाळेतील शिक्षकांना १५० व्या जयंतीनिमित्त भगवान बिरसा मुंडा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ या नावाने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषद, खाजगी शिक्षण संस्था अंतर्गत शिक्षकांना देखील आदर्श पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तर माध्यमांची निगडित शिक्षकांना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार आहे.माध्यम क्षेत्राशी निगडित असलेल्या पुरस्कारामध्ये यावर्षी आष्टी येथील सहशिक्षक राजेंद्र लाड,माजलगाव येथील प्रा. सुदर्शन स्वामी, परळी वैजनाथ येथील सहशिक्षक अनुप कुसुमकर, अंबाजोगाई येथील सहशिक्षक ज्ञानेश मातेकर, केज तालुक्यातील सहशिक्षक नरहरी काकडे आणि पाटोदा येथील प्राचार्य तुकाराम तुपे या गुणवंत सहा शिक्षकांना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे. निवड केलेल्या शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


# बोरगाव बु. येथे शिवसेवा गणेश मंडळाच्या वतीने श्रीच्या मूर्तीची स्थापना

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोरगाव बु. येथे शिवसेवा गणेश मंडळाकडून प्रत्येक वर्षी सार्वजनिक गणेश उत्सव साजरा केला जातो. यावर्षीही शिवसेवा गणेश मंडळाच्या वतीने आकर्षण गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

काल सायंकाळी ६:०० शिवसेवा गणेश मंडळाच्या वतीने श्री च्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी सौ. वैष्णवी गाते आणि श्री आकाश गाते या नवं दाम्पत्याला महापुजेचा मान भेटला.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष यश गव्हाणे, उपाध्यक्ष दिनेश गव्हाणे, कोषाध्यक्ष दादासाहेब वळेकर, सरपंच बाळासाहेब गव्हाणे बिट अंमलदार बांगर साहेब, गोरे साहेब तसेच बाळ गोपाळासह मंडळाचे स्वयंसेवक आणि गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077